■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : १९

■ दि. ०७ मे २०२६, वार : गुरूवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# मृद व जलसंधारणाच्या कामांना गती देवून पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त कामे पूर्ण करावीत - मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

## जिल्हास्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्याच्या सूचना, जिल्हास्तरीय यंत्रणांकडून कामांचा आढावा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जलसंधारणाची जास्तीत जास्त कामे आगामी पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. यासाठी सातत्याने पाठपुरावा करून प्रगतीपथावरील कामांना गती देण्याच्या सूचना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत दिल्या. तसेच या कामांच्या संथगतीबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उषाताई पाटील, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांच्यासह मृद व जलसंधारण विभागाचे राज्यस्तरीय व विभागस्तरीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांनी जिल्ह्यातील जलसंधारण कामांची पाहणी केल्यानंतर जलसंधारणाच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला.

लातूर जिल्ह्यात जलसंधारणाची काही मंजूर कामे विविध कारणांमुळे रद्द झाली आहेत. या कामांची पडताळणी करून यापैकी कोणती कामे नव्याने प्रस्तावित करता येणे शक्य आहे, याची खात्री करावी. तसेच सन २०२२-२३ मधील पासून काही कामे अपूर्ण असल्याचे दिसून येत असून ही कामे पूर्ण करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. काही योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक असून ते प्राप्त करून घेण्याची कार्यवाही त्वरित करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून १७ कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत. या प्रकल्पांचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करावा, अशा सूचना मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांनी दिल्या.

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत होणारी सर्व कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण होणे गरजेचे आहे. या कामांची जिओ टॅगिंग होणे आवश्यक आहे. या कामांची आवश्यकतेनुसार त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करण्यात येणार आहे. जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत अभिसरणाची कामे, विशेष निधीतील कामे गतीने पूर्ण करावीत, अशा सूचना मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांनी दिल्या. निधी उपलब्ध असतानाही जलसंधारणाची कामे सुरू करण्यासाठी, तसेच ती पूर्ण करण्यासाठी विलंब होत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच प्रगतीपथावरील सर्व कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करावा, असेही त्यांनी सांगितले.




भूसंपादनामुळे रखडलेल्या मृद व जलसंधारण विभागाच्या प्रकल्पांचा आढावा घेताना आवश्यकतेनुसार भूसंपादनासाठी निधी वितरित करण्याचे निर्देश मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांनी दिले. तसेच जिल्ह्यातील पाझर तलाव दुरुस्ती, जलसंधारणाच्या जुन्या कामांची दुरुस्ती आणि नवीन कामांचा प्रस्ताव मृद व जलसंधारण विभागाने तयार करावा. सर्व संबंधित विभागांनी जलतारा प्रकल्प राबविण्याला प्राधान्य द्यावे. सध्या पुरेसा पाणीसाठा असला तरी एल निनोमुळे निर्माण होणारी संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा जलसंधारण अधिकारी जावेद पटेल, संजय नाईक यांनी मृद व जलसंधारण विभागामार्फत गेल्या पाच वर्षांत जिल्ह्यात करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली.

## अनाधिकृत बॅनरवर मनपा कार्यवाही, पाच हजार दंड वसुल



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात फलक / बॅनर्स / होर्डींग्जण लावणेसाठी महानगरपालिकेची परवानगी आवश्यक आहे. तथापी शहरामध्ये सदयस्थितीत लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर, स्टिकर, त्रिकोणी चौकोनी आकारातील छोटे फ्लेक्स/ बोर्ड, जाहिरात फलक/ पत्रके, गुंडाळफळी, कापडी फलक इत्यादी अनाधिकृत व अयोग्य ठिकाणी लावल्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. तसेच सदरील अनधिकृत जाहिरात फलक/ पोस्टर्स इत्यादी हे सुरक्षितपने नसल्याकारणाने दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअनुषंगाने बुधवार दि.६ मे रोजी महानगरपालिकेमार्फत अशोक हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मेन रोड वरील सेंट्रल पोल वर अनधिकृत बॅनर लावणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करून ५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

शहरात लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर, स्टिकर, त्रिकोणी चौकोनी आकारातील छोटे प्लेपक्सि/ बोर्ड, जाहिरात फलक/ पत्रके, गुंडाळफळी, कापडी फलक इत्यादी हे तात्काळ काढून घेवून मनपास सहकार्य करावे. अन्यथा सदर अनधिकृत जाहिरात फलक / पोस्टर्स इत्यादी लावणा-यांवर दंडात्मक कार्यवाही करुन गुन्हा नोंद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

## लातूरमध्ये पेट्रोल टंचाईचा प्रश्न गंभीर भाजयुमोचा निवेदनाद्वारे प्रशासनाला इशारा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात निर्माण झालेल्या पेट्रोल टंचाईच्या पार्श्वभूमीवर आज निवासी उपजिल्हाधिकारी केशवजी नेटके यांना भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. शहरातील वाढत्या इंधन टंचाईमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, या समस्येवर तात्काळ तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली.

या निवेदनात पुरवठा विभागाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पेट्रोल पंप चालकांना योग्य त्या सूचना द्याव्यात, तसेच सुरळीत इंधन पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली. प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी भाजयुमो जिल्हाध्यक्ष ओम आप्पा धरणे, सरचिटणीस अक्षय स्वामी, उपाध्यक्ष गणेशजी बेद्रे, विद्यार्थी आघाडी प्रभारी पृथ्वीराज शिंदे, मंडल अध्यक्ष ऋषिकेश झुंजे पाटील, चिटणीस पवनजी खोबरे, सोहम देवरसे, कोषाध्यक्ष प्रसादजी जगताप, तसेच डॉ. अभिषेक धर्माधिकारी आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुराज्याचे शिल्पकार राजर्षी शाहू महाराजांना धाराशिवमध्ये अभिवादन

**धाराशिव/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय, समता आणि प्रगतिशील विचारांचा वारसा जपणारे कोल्हापूर संस्थानचे अधिपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा ६ मे रोजी स्मृतीदिन धाराशिवमध्ये श्रद्धापूर्वक पाळण्यात आला. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर घडविणाऱ्या या महान राजर्षींना नागरिकांनी त्रिवार मुजरा केला.

येथील शाहू महाराज चौकात त्यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राजर्षी शाहू समितीचे अध्यक्ष बलराज रणदिवे, नगरसेवक पंकज भोसले, नगरसेवक सुनील आंबेकर, रोहित पडवळ, माजी नगरसेवक खलील सर, माजी नगरसेवक कुणाल निंबाळकर, मराठा महासंघाचे अध्यक्ष मोहन मुंडे, नगरसेवक नरसिंह मिटकरी, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष आकाश मुंडे, गणेश साळुंखे, प्रजय पवार, सर्फराज कुरेशी, बाळासाहेब गाडेकर, प्रशांत सावंत, शहानवाज सय्यद, ओम नाईकवाडी, वाजिद सय्यद आदी उपस्थित होते.

## एसटीच्या NCMC कार्डची जादा दराने विक्री केल्यास परवाना रद्द होणार- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सवलतधारक प्रवाशांना NCMC (National Common Mobility Card) स्मार्ट कार्डचे वितरण सुरू करण्यात आले आहे. यासाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्येक आगार व प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्डे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

नवीन NCMC कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १९९ रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्ड विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, अवाजवी दर आकारणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. यानुसार, काही विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, एसटी महामंडळाने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती अधिक सुसंगत, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने देण्यासाठी NCMC कार्ड कार्यप्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया सुरू असून, टप्प्याटप्प्याने इतर सवलतधारक प्रवाशांचाही या योजनेत समावेश करण्यात येणार आहे.

महामंडळाच्या सूचनेनुसार, लवकरच सर्व सवलतधारक प्रवाशांसाठी एसटी प्रवासादरम्यान NCMC कार्ड वापरणे अनिवार्य केले जाणार आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुलभ होण्याबरोबरच सवलतींचा लाभ अचूक आणि डिजिटल पद्धतीने देणे शक्य होणार आहे. तसेच, NCMC कार्डद्वारे तिकीट वितरण, कार्ड टॉप-अप आणि इतर व्यवहारांसाठी एकसंध मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली आहे. सर्व आगार व्यवस्थापकांना ही कार्यपद्धती काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून, प्रवाशांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

या उपक्रमामुळे एसटी सेवा अधिक आधुनिक, पारदर्शक आणि प्रवासी-केंद्रित होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

# जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे..! - कल्याणराव हनवते (बौद्धाचार्य)

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** शांती करुणा आणि प्रज्ञेचा संदेश देणारे महामानव तथागत भगवान गौत्तम बुद्ध यांच्या त्रिविध पावन जयंती निमित्त वैशाख बुद्ध पौर्णिमा ''ज्वेल्स - लॉर्ड बुद्धा पार्क'' नेरूळ नवी मुंबई येथे विश्वशांती दूथ तथागत भगवान गौत्तम बुद्ध यांची २५७० वी जयंती ०१ मे २०२६ रोजी सायंकाळी दीपोत्सव साजरा करण्यात आला.



सदर कार्यक्रमास पर्यटक जपानीज मेहमान यांनी उपस्थित राहून लॉर्ड बुद्धास त्रिवार वंदन केले, नक्कीच वर्तमानकाळ आणि भविष्यात हे पार्क एक पर्यटकांसाठी आकर्षण पॉईंट बनणार त्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने याकडे लक्ष केंद्रित करून या पार्कचे सुशोभीकरण व डेव्हलपिंग करावे, मूर्तीच्या समोर कंजेस्टेड जागा असल्यामुळे पर्यटकांना ध्यान साधना / वंदन करण्यास किंवा सर्व उपस्थितांचा फोटो व्यवस्थित काढता येत नाही याची नोंद घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेने यात सुधारणा करावी, जेणेकरून नवी मुंबईचे नाव महाराष्ट्रच काय तर संपूर्ण देशात हे पर्यटन केंद्र जगात नावलौकिक म्हणून उदयास येईल, या सुंदर अशा शांती वनामध्ये तथागतांना वंदन करण्यासाठी आम्ही सारे बांधव एकत्र येऊन बारा महिन्याच्या बारा पौर्णिमा साजरी करत आहोत.

या संदर्भात महानगरपालिकेने याची नोंद घेऊन या पार्कचे लवकरात लवकर सुशोभीकरण करावे, सदर ठिकाणी कार्यक्रमास शेकडोच्या संख्येने बौद्ध-आंबेडकरी समाज व पर्यटकांचा ओघ वाढलेला दिसून येत आहे हे आपल्या सर्व नवी मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी व भूषण आहे.

सदर कार्यक्रमास दानदाते समाजसेवक : महेश खरे यांनी खीरदान केली. त्यावेळी अँड. संजय गायकवाड, पंचशील सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष : प्रल्हाद गायकवाड, विशाल कांबळे, पंचशील सामाजिक संस्थेच्या महिला अध्यक्षा : शालिनीताई अवचार सह अनेक महिला उपस्थित होत्या, तसेच भारतीय बौद्ध महासभा नेरूळ शाखा अध्यक्ष : सूर्यकांत सवाखंडे इत्यादी पदाधिकारी लहानथोर बालक बालिका यांनी उपस्थित राहून तथागत भगवान गौत्तम बुद्धांना वंदन केले.

## अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** वीर हनुमान मंदीर बार्शी रोड यांच्या वतीने ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज माऊली औसेकर, गहिनीनाथ महाराज औसेकर व गुरूबाबा महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १० मे ते १६ मे या कालावधीत ह.भ.प. ज्ञानेश्वरदेव अष्टेकर यांच्या सानिध्यात अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज काकडा आरती, विष्णू सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, महिला भजनी मंडळ, हरिपाठ व दररोज रात्री हरिकीर्तन असा भरगच्च कार्यक्रम आयोजीत करण्यात आले आहेत. तरी लातूर परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन द्वारकादास सोनी, सूर्यभान सगर, रविशंकर केंद्रे, डॉ. सुरेंद्र कोतवाडे, गणपतराव माने, मलवाड आदिंनी केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बार्शी रोड येथील हनुमान मंदिरच्याव तीने अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजीत करण्यात येतो. यावर्षीही दि. १० ते १६ मे या कालावधीत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत हभप खडके महाराज, हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, गोपाळ महाराज धारखेडकर, हभप लक्ष्मण महाराज देवकर, हभप विठ्ठल महाराज वासकर, हभप गुरू महाराज देगलूरकर यांचे कीर्तन होईल तर दि. १७ मे रोजी हभप बन गुरूजी महाराज उदगीरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. तरी सर्व धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त प्रकाश नगर वासियांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गौत्तम बुद्ध व सम्राट अशोक यांचा संयुक्त जयंती उत्सव धम्मा लोटस यांच्या वतीने उत्साहात साजरा

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** दिनांक ३/५/२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सीवूड्स येथे ''धम्मा लोटस / धम्म सोल्जर'' नवी मुंबई मधील इतर सामाजिक संघटनांच्या वतीने तथागत सम्यक सम्बुध्द गौत्तम बुद्ध व भारताचे महान सम्राट अशोक यांची संयुक्त जयंती उत्सव सीवूड्स येथे उत्साहात साजरा करण्यात आला धम्म लोटस अभियाना अंतर्गत हा आगळा वेगळा प्रयत्न होता, आपण सर्वांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल आपल्या सर्वांना नमो बुद्धाय क्रांतिकारी जय भिम कार्यक्रमांमध्ये विभागातील वेगवेगळ्या संघटनांचे प्रतिनिधींनी आम्ही दिलेल्या विषयावर अभ्यासपूर्ण विचार मांडले त्यामध्ये युवा वक्ता कुमारी तीषा संबोधी व परिचय जाधव त्याचबरोबर प्राध्यापक आशाताई बोदीले तसेच सुनील कांबळे व हरिश्चंद्र पवार या सन्माननीय वक्त्यांनी त्यांना दिलेल्या विषयाला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मान. डॉक्टर विलास खरात सर यांनी दीड तास आपल्या वक्तृत्वाने पीन ड्राफ्ट सायलेन्स ठेवून बौद्धिक प्रबोधन केले त्यांचेही खूप खूप आभार, या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर वसंत मस्के सरांनी अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने करूण कार्यक्रमाला एक वेगळी उंची प्राप्त करून दिली. त्याचबरोबर सर्वात शेवटी प्रश्न उत्तराच्या तासांमध्ये डॉक्टर विलास खरात सर व डॉक्टर वसंत मस्के सर दोघांनी व श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन सर्वांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. आजच्या काळामध्ये एक अतिशय दर्जेदार कार्यक्रमाचे आपण सर्व साक्षी झालात त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार व धन्यवाद.

धम्मा लोटस/धम्मा सोल्जर यांच्यावतीने संपूर्ण नवी मुंबईत उपक्रम राबवून वर्तमान काळ आणि आगामी काळात युवकांना यात अधिक संख्येने सामील करून घेणार व त्यांच्यात एक चर्चा विचार विमर्श करण्यासाठी एक परिसंवाद प्लॅटफॉर्म



उपलब्ध करून देणार असे डॉक्टर विलास खरात सर यांनी म्हटले.

संपादकीय...

## काँग्रेसची जागा भाजपाने घेतली...

भारतीय राजकारणात सत्तांतर हे लोकशाहीचे मूलभूत वैशिष्ट्या आहे. स्वातंत्र्यानंतर विविध राज्यांत सत्ता हस्तांतराचे वेगवेगळे पॅटर्न दिसून आले आहेत. काही ठिकाणी दीर्घकाळ एकाच पक्षाचे वर्चस्व, काही ठिकाणी आलटून-पालटून आणि काही ठिकाणी नव्या शक्तींचा उदय झालेला दिसला आहे. आज आलेल्या पाच राज्यांच्या निवडणूक निकालातून जसा सत्तांतराचा झंझावात दिसतो तसाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचा देखील झंजावात दिसून आला आहे. बिहारमध्ये गंगेच्या खोऱ्यापासून बंगालमध्ये उपसागरापर्यंत झारखंडचा अपवाद वगळता भगवे वादळ निर्माण होणे आणि त्याचा संपूर्ण देशावर प्रभाव असणे हे भविष्यातील भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे वळण ठरू शकते. एकेकाळी काँग्रेस अशी देशभर सत्ता हस्तगत करणारा पक्ष होता. आता ती जागा भाजपने घेतली आहे हे या निकालाने स्पष्ट झाले आहे. या निकालांचा निष्कर्ष स्पष्ट आहे: पाच राज्यांच्या निकालांनी भारतीय राजकारणात एकाच वेळी केंद्रीकरण आणि प्रादेशिक पुनर्रचना असा दुहेरी प्रवाह सुरु झाला आहे. देशातील सत्ताधारी भाजपची पकड वाढत असताना, राज्यनिहाय ओळख आणि स्थानिक नेतृत्व यांचे महत्त्व अजूनही कमी झालेले नाही. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्याभोवती फिरणारे राजकारण अजून कोसळलेले नाही, पण त्याला गंभीर आव्हान उभे राहिले आहे. भाजपने येथे निर्माण केलेली जागा ही केवळ जागांची वाढ नाही, तर वैचारिक हस्तक्षेप आहे. डाव्यांच्या पतनानंतर तृणमूल काँग्रेसने व्यापलेली राजकीय पोकळी आता पुन्हा एकदा बदलाच्या उंबरठ्यावर आहे. ममता यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा अस्त तातडीने होईल असे म्हणणे घाईचे ठरेल; मात्र अपरिहार्यताचा भास नक्कीच कमी झाला आहे. आसाममध्ये निकालांनी भाजपची संघटनशक्ती आणि प्रादेशिक मुद्यांवर पकड सिद्ध केली आहे. सीमावाद, नागरिकत्व, ओळख आणि विकास या मुद्यांवर सातत्याने काम करत भाजपने येथे आपले वर्चस्व मजबूत केले आहे. ईशान्य भारतात राष्ट्रीय पक्ष म्हणून स्वतःची ओळख निर्माण करण्यात भाजपला यश आले आहे, आणि हा विस्तार केवळ निवडणूक विजयापुरता मर्यादित नाही. केरळमध्ये मात्र वेगळे चित्र दिसते. दीर्घकाळ डाव्यांचा गड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यात आता राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला नव्याने उभारी मिळताना दिसत आहे. डाव्या विचारसरणीचा प्रभाव अजूनही खोलवर आहे, पण बदल हवा या मानसिकतेने काँग्रेसला संधी निर्माण झाली आहे. इथेही केवळ सत्ता बदल नाही, तर विचारांच्या स्पर्धेचा नवा टप्पा आहे. तामिळनाडूमध्ये सर्वाधिक रोचक घडामोडी दिसतात. द्रविडी राजकारणाचा गड असलेल्या या राज्यात तामिळ अस्मिता हा केंद्रबिंदू कायम असला, तरी नेतृत्वात बदलाची लाट दिसत आहे. पारंपरिक पक्षांना मिळालेला धक्का आणि नव्या दमाच्या थलपती विजय या अभिनेत्याकडे झुकलेला जनतेचा कल हे संकेत आहेत की मतदार आता वारसाहक्कावर चालणाऱ्या राजकारणाला पर्याय शोधत आहेत. ही बदलाची मानसिकता भविष्यात भाजपसाठी थेट फायद्याची नसेल, पण प्रादेशिक समीकरणे सैल करून नवी शक्यता निर्माण करणारी ठरू शकते. जसे की डाव्यांची मजबूत पकड भाजप कधी सैल करू शकला नसता. मात्र ममता बॅनर्जी यांना बळ देऊन तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी जे शक्यतेचे द्वार खुले केले होते, तिथे आता भाजप सत्तेचा महामार्ग झाला आहे. पुदुचेरीमध्ये सत्तास्पर्धा अधिक सूक्ष्म आहे. येथे राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांमधील समीकरणे सतत बदलत राहतात. स्थानिक नेतृत्व, युतीची गणिते आणि केंद्राशी असलेले संबंध यावर सत्ता ठरते. त्यामुळे हा प्रदेश राजकीय प्रयोगशाळा म्हणून पाहिला जातो, जिथे छोटे बदलही मोठा परिणाम घडवू शकतात. विरोधकांच्या रणनीतीकडे पाहिले, तर अजूनही एकसंधता दिसत नाही. राहुल गांधी यांची व्यापक आघाडीची भूमिका आणि चिदंबरम यांच्यासारख्या अनेक नेत्यांचा सावध दृष्टिकोन या दोन टोकांमध्ये काँग्रेस अडकलेली दिसते. प्रादेशिक पक्षांसोबत युती करून भाजपला रोखावे की स्वतंत्रपणे उभे राहावे, हा प्रश्न अजून अनुत्तरित आहे. याउलट भाजपने प्रत्येक राज्यात स्थानिक नेतृत्वाला पुढे करून आणि राष्ट्रीय मुद्यांची जोड देऊन एक सुसंगत रणनीती राबवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने देशभर विस्तार साधला आहे, हे या निकालांतून पुन्हा अधोरेखित झाले. मात्र विरोधकांचा आरोप असतो की हे यश केवळ यंत्रणांच्या वापरातून मिळाले आहे. आरोप पूर्णपणे फेटाळता येत नाही पण, संघटनशक्ती, संसाधने आणि सत्तेचा प्रभाव या तिन्हींचा संगम भाजपच्या विजयामागे दिसतो. त्याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. अर्थातच भारतातील राजकारण एका नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे, जिथे राष्ट्रीय पक्षाचे वर्चस्व वाढत असले तरी प्रादेशिक अस्मिता, स्थानिक नेतृत्व आणि मतदारांची बदलाची इच्छा हे घटक अजूनही निर्णायक आहेत. जो पक्ष या तिन्हींचा समतोल साधेल, तोच पुढील दशकात देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरेल.

# माणुसकीच्या शोधात विनोद खटके नावाचं व्यक्तिमत्व

व्ही. एस. पँथर युवा सन्घटना यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून गेली ६ वर्ष सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळा हा उपक्रम राबविण्यात येतो. या सोहळ्याचे २०२६ हे ७ वे वर्ष आहे. प्रत्येक मानवी समूहातील ज्या व्यक्तींचे जीवन विस्कटलेले आहे त्यांना पुन्हा नव्याने उभारी देण्याचं व त्यांच्या संसाराला हातभार लावण्याच काम विनोद खटके हे सातत्याने करत असतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात 'मनुष्याने केवळ स्वार्थ चं न साधता परमार्थ ही केला पाहिजे ही धम्माची शिकवण आहे. नुसते आपलेच पोट भरले म्हणजे सर्व काही झाले असे समजू नका.

**कबीर कहे कुछ**
**उत्तम किजीए।**
**आप खाए**



**औरो क दीजिए।**

कबीराच्या यां दोह्या प्रमाणे उद्योग करा आपण खा व इतरांना ही द्या. बाबासाहेबांच्या या शिकवणीने विनोद खटके यांनी आपणही इथल्या मातीच काहीतरी देण लागतो म्हणून स्वतः ला समाजकार्यामध्ये झोकून देऊन तळागाळातील गरीब -गोरांच्या बिकट परिस्थिती मध्ये रंग भरण्याचं कार्य आपल्या संघटनेच्या माध्यमातून करत आहेत. सर्वांचे जगणे उज्वल व्हावे यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात त्यांची ही सद्भावना बुद्ध, कबीर, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराचे त्यांच्या मधलं सौन्दर्य दाखवून देते. जनसेवा हीच ईश्वर सेवा हा संदेश उराशी बाळगून सतत माणुसकीच्या शोधात असणारं हे व्यक्तिमत्व आपणास दिसून येईल.



आजच्या स्वार्थी जगामध्ये समाजाचं हित करणारा प्रामाणिक नेता लोप पावला आहे. केवळ राजकीय पोळी भाजून घेणे व जनतेला आमिष दाखवून भिकेच्या खाईत लोटून देणे अश्या स्वार्थी नेत्यांची गर्दी होत असताना दिसत आहे. याला अपवाद आपल्या ताटातली भाकरी इतरांना देऊन त्यांची भूक भागवणारा समाज कार्यात पुढे सरसावलेला नेता म्हणजे विनोद खटके हे लिहिणे वावगे ठरणार नाही. सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळा हा उपक्रम राबवून गरीब गोरांच्या लेकी बाळाचे संसार थाटवणे त्यांना लागणाऱ्या संसार उपयोगी वस्तू देणे तेही स्वखर्चातून हे खूप अतुलनीय कार्य आहे.

तळागाळातील लोकांच्या हितासाठी ज्यांच्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांनी उभे आयुष्य वेचले त्यांच्या चरणी हे कार्य समर्पित करून बाबासाहेबांची जयंती आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरी करण्याचा विनोद खटके यांचा मानस एकदम स्तुत्यचं म्हणावा लागेल. व्ही. एस. पॅन्थर संघटनेचे समाजकार्य असेच जोमाने चालत राहावो व प्रत्येक समाजातील घटकाला उज्ज्वल भवितव्याची एक नवी दिशा मिळावी हीच अपेक्षा....!

उत्साहाचा जय भिम !

**– सचिन सुरवसे**

# धाराशिवच्या ऐतिहासिक गडांना नवे जीवन : नळदुर्ग आणि परांडा किल्ल्यांच्या जतन-संवर्धनासाठी कोट्यवधींची योजना




जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग हे एक ऐतिहासिक स्थान असून,येथे असलेला नळदुर्ग किल्ला हा प्रमुख आकर्षण आहे.हा किल्ला प्राचीन काळातील महत्त्वाचा किल्ला मानला जातो.किल्ल्याची मूळ उभारणी कल्याणीच्या चालुक्य काळात झाल्याची नोंद आहे.त्या काळात चालुक्यांची राजधानी असलेल्या कल्याणी शहराच्याजवळ असल्यामुळे या किल्ल्याला विशेष महत्त्व होते. सुरुवातीला हा किल्ला मातीचा गढीवजा होता.यानंतर बहामनी सत्तेच्या काळात या किल्ल्याचे रूपांतर भक्कम दगडी बांधकामात करण्यात आले.इ.स. १३५१ ते १४८० या कालावधीत बहामनी सुलतानांनी या किल्ल्याचा विस्तार केला.पुढे आदिलशाही काळात किल्ल्याचे नाव 'शहादुर्ग' असे ठेवण्यात आले.इब्राहिम आदिलशहा दुसरा यांच्या कारकीर्दीत इ.स.१६१३ मध्ये बोरी नदीवर बंधारा बांधून 'पाणी महल'ची निर्मिती करण्यात आली.हा पाणी महल त्या काळातील स्थापत्यशास्त्र व अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हा किल्ला हैदराबादच्या निजामाच्या अखत्यारीत गेला आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत त्याच ताब्यात राहिला. निजाम शासनाच्या १२ जानेवारी १९५३ च्या अधिसूचनेनुसार किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारक घोषित केले.राज्य पुनर्रचनेनंतर हा किल्ला महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या ताब्यात आला असून त्याची देखभाल व दुरुस्तीचे काम पुरातत्व विभागामार्फत केले जाते.

**विभागीय निधी अंतर्गत व्यापक विकास आराखडा**

नळदुर्ग किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार,या स्मारकाचा 'महावारसा विशेष स्मारक योजना' अंतर्गत समावेश करण्यात आला आहे.या कामासाठी वास्तुविशारदांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी रुपये १० कोटी ८७ लक्ष ५५ हजार ६९८ रुपये इतक्या रकमेचा सविस्तर विकास आराखडा तयार केला आहे.हा प्रस्ताव दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**या आराखड्यातील प्रमुख कामे पुढीलप्रमाणे आहेत**




स्मारक परिसरातील झाडेझुडपे काढणे,शास्त्रोक्त पद्धतीने उत्खनन, तटबंदीचे मजबुतीकरण,दगडी पायऱ्या व गार्ड रेलिंग,रणमंडल भागातील तटबंदीची दुरुस्ती,भेगा पडलेल्या भिंतींना ग्राऊटिंग,पाणी महल व उपळी बुरुज परिसरातील दुरुस्ती,दगडी पाथवे निर्माण, पर्यटकांसाठी दिशादर्शक फलक, स्मारकाचे दस्तऐवजीकरण,इतर पूरक कामे आदी कामांचा समावेश आहे.प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

**जिल्हा नियोजन निधीतूनही संवर्धनाला चालना :**

शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत गडकिल्ले,मंदिरे व संरक्षित स्मारकांच्या संवर्धनासाठी ३ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

त्यानुसार नळदुर्ग किल्ल्यासाठी वर्ष २०२५-२६ मध्ये रुपये ४ कोटी ६१ लक्ष ९२ हजार २०४ रुपये इतक्या खर्चाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

**या अंतर्गत प्रस्तावित कामे पुढीलप्रमाणे आहेत**

हत्तीखाना,प्रवेशद्वाराजवळील ओवऱ्या,कचेरी,मस्जिद, आदिलशाही मस्जिद,रंगमहाल, धान्य कोठार यांचे जतन व दुरुस्ती, इमारतींमधील भेगा व सांधे दुरुस्त करणे (ग्राऊटिंग),किल्ल्याच्या भिंतींची स्वच्छता व झाडेझुडपे काढणे,जुने प्लास्टर काढून नवीन चुन्याचे प्लास्टर,लाकडी व दगडी बांधकामांची दुरुस्ती व गळती प्रतिबंधक उपाय,उपळी बुरुजाच्या कमानींचे मजबुतीकरण,इतर पूरक कामे करणे आदी कामांचा समावेश आहे.या अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सध्या ई-निविदा प्रक्रिया सुरू आहे.निविदा प्रक्रिया पूर्ण होताच संबंधित कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहे.

**ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी ठोस पावले**


नळदुर्ग किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी शासनाने आखलेल्या या योजनांमुळे ऐतिहासिक वारशाचे संरक्षण होण्यास मोठी मदत होणार आहे.प्राचीन स्थापत्यकलेचा हा अद्वितीय नमुना पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

**भुईकोट वैभवाची नवी उभारी : परांडा किल्ल्याच्या जतन-संवर्धनासाठी ऐतिहासिक पुढाकार**

परांडा तालुक्यातील परांडा किल्ला हा किल्ला धाराशिवपासून सुमारे ८० कि.मी.अंतरावर आहे.परांडा- करमाळा मार्गापासून अर्धा कि.मी.पश्रिचमेस हा किल्ला स्थित आहे.किल्ल्याच्या भौगोलिक स्थानाचा विचार केल्यास सीना व दुधना या उपनद्यांच्या परिसरात परांडा शहर वसलेले आहे. दख्खनच्या राजकारणात या किल्ल्याचे महत्त्व विशेष होते. सोलापूरहून विजापूरपर्यंत प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी परांडा किल्ल्यावर प्रभुत्व आवश्यक मानले जात असे. त्यामुळे मध्ययुगीन काळात विविध सत्तांमध्ये या किल्ल्यासाठी संघर्ष झाल्याचे दिसून येते.

परांडा किल्ला हा मराठवाड्यातील एक महत्त्वाचा भुईकोट किल्ला असून आकाराने लहान असला तरी देखणा व बळकट आहे.विशेष म्हणजे,प्रत्यक्ष युद्धात फारसा सहभाग नसतानाही हा किल्ला मध्ययुगीन लष्करी स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखला जातो.

किल्ल्याचा तलविन्यास चौकोनी असून संरक्षणासाठी सर्व बाजूंनी खोल व भव्य खंदक खोदण्यात आलेला आहे.या खंदकात दोन विहिरीही आहेत.किल्ल्यास दुहेरी तटबंदी असून बाह्य तटबंदीला २६ तर आतील तटबंदीला १९ बुरुज आहेत. तटबंदीची रचना 'चिलखती' प्रकारातील असून त्यातील अंतर आवश्यकतेनुसार बदलते. मुख्य तटाभोवती असलेल्या दुसऱ्या तटाला 'शेरहाजी' असे संबोधले जात असे.




किल्ल्याच्या तटबंदीमधून खंदकात उतरण्यासाठी सात गुप्त मार्ग तयार करण्यात आले आहेत.खंदकावर झुलता पूल असून तो आवश्यकतेनुसार काढता येण्याची सोय होती.किल्ल्याच्या अंतर्भागात नगारखाना,जामा मस्जिद, अंबरखाना,घोडपागा,हाथीखाना, हमामखाना,कचेरी,अष्टकोनी विहीर, दोन अन्य विहिरी,महादेव मंदिर, नरसिंह मंदिर तसेच दोन दर्गे आहेत. याशिवाय 'मलिक-ए-मैदान', 'अजदहा पईकर','बांगडी तोफ' यांसारख्या तोफा येथे पाहायला मिळतात. त्यामुळे हा किल्ला आकाराने लहान असला तरी लष्करी दृष्ट्या अत्यंत परिपूर्ण व आकर्षक आहे.पुढे स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत हा किल्ला निजामाच्या ताब्यात राहिला. निजाम शासनाने १२ जानेवारी १९५३ अधिसूचनेनुसार किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले होते.राज्य पुनर्रचनेनंतर हे स्मारक महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाकडे हस्तांतरित झाले.

**विभागीय निधीतून जतन-दुरुस्तीचा व्यापक आराखडा**

परांडा किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार,या स्मारकाचा 'महावारसा विशेष स्मारक योजना' अंतर्गत विकास आराखड्यात समावेश करण्यात आला आहे.

या कामासाठी वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी रुपये १० कोटी २२ लक्ष २७ हजार २५० रुपये इतक्या खर्चाचा सविस्तर अंदाजपत्रक तयार करून पुरातत्व विभागाने त्यांच्या मुख्यालयास सादर केले आहे.

**या आराखड्यातील प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे आहेत :**

स्मारक परिसरातील तसेच तटबंदीवर वाढलेली झाडेझुडपे काढणे.स्मारक परिसरात शास्त्रोक्त पद्धतीने उत्खनन करणे. मुख्य प्रवेशद्वारालगतच्या आतील व बाह्य भागातील क्षतीग्रस्त तटबंदीची दुरुस्ती करणे.तटबंदीच्या भिंतींना दर्जा भरणे. तटबंदीवरील क्षतीग्रस्त दगडी कंगोरे व तटबंदीलगत दगडी पाथवे तयार करणे.तटबंदीच्या भेगा पडलेल्या भिंतींना ग्राऊटिंग करणे. इतर अनुषंगिक कामे प्रस्तावित आहे. वरील सर्व बाबींचा समावेश असलेले अंदाजपत्रक प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस संचालनालयास सादर करण्यात आले आहे.

**वारसा जतनासाठी निर्णायक टप्पा :**

या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळताच निविदा प्रक्रिया राबवून किल्ल्याच्या जतन,दुरुस्ती व संवर्धनाच्या कामांना सुरुवात करण्यात येणार आहे.या उपक्रमामुळे परांडा किल्ल्याच्या ऐतिहासिक व स्थापत्यवैभवाचे जतन होऊन पुढील पिढ्यांसाठी हा अमूल्य वारसा अधिक भक्कमपणे उभा राहणार आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**
**(स्रोत : सहाय्यक संचालक,पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर)**

## संक्षिप्त...

### पारंपारिक आहारच निरोगी जीवनाचे गमक - प्रा. अन्वेषा बात्रा

'टेक-वारी २.०' अंतर्गत 'फूड फॉर थॉट' सत्रात मार्गदर्शन




**मुंबई/प्रतिनिधी** : बदलत्या जीवनशैलीमुळे खाद्यसंस्कृतीत अनेक नवे ट्रेंड आले असले तरी भारतीय पारंपारिक आहार आणि बनविण्याच्या पद्धतीच खऱ्या अर्थाने पोषक आणि आरोग्यदायी असल्याचे मत इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या प्राध्यापक अन्वेषा बात्रा यांनी व्यक्त केले.

मंत्रालयात 'टेकवारी २.०' हा प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत अत्याधुनिक तंत्रज्ञान, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य, संगीत आणि आहार यांसारख्या विषयांवर अभ्यासपूर्ण सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून 'फूड फॉर थॉट' या सत्राचे आयोजन करण्यात आले.

प्रा. बात्रा म्हणाल्या की, ताणतणावपूर्ण जीवनात आरोग्यदायी अन्न साध्या आणि सोप्या पद्धतीने बनवणे आवश्यक आहे. भरपूर तेल वापरण्यापेक्षा प्रेमाने बनविलेले अन्न अधिक चविष्ट आणि आरोग्यदायी असते. भौगोलिक परिस्थितीनुसार आपल्या भागात पिकणारे अन्न आणि हंगामानुसार उपलब्ध होणारी फळे-भाज्या यांचे सेवन करणे अधिक योग्य ठरते.

त्या पुढे म्हणाल्या की, जिभेची चव आणि पोटाचे आरोग्य यामध्ये समतोल साधणे गरजेचे आहे. योग्य आहार घेतल्यास शरीर निरोगी राहते आणि मन प्रसन्न राहते. त्यामुळे कामातही सकारात्मकता वाढते.

व्हिटामिन सी, ए, फॉलिक ॲसिड, पाणी, झिंक तसेच फळे, भाज्या, कडधान्ये आणि ड्रायफ्रूट्स यांचा आहारात योग्य प्रमाणात समावेश केल्यास वेगळ्या डाएटची गरज भासत नाही. संतुलित आणि योग्य प्रमाणातील आहारातूनच निरोगी शरीर साध्य होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

या सत्रात शेफ अमोल बलकवडे यांनी घरात सहज उपलब्ध असलेल्या पदार्थांपासून आरोग्यदायी रेसिपी तयार करून दाखवल्या. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या पदार्थांचा आस्वादही घेतला.

### पंजाबमधील अमृतसर येथील लष्करी छावणीबाहेर स्फोट; परिसरात भीतीचं वातावरण, पोलिसांनी तपास केला सुरु

अमृतसर : पंजाबमधील अमृतसर शहरातून एक मोठी बातमी समोर येत आहे. येथील 'खासा' भागात असलेल्या लष्करी छावणीच्या बाहेर रात्री उशिरा स्फोट झाल्याचे वृत्त प्राप्त झालंय. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालंय. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री ११ वाजताच्या सुमारास अचानक मोठा स्फोटाचा आवाज ऐकू आला, ज्यामुळे रहिवासी घाबरून आपापल्या घरातून बाहेर धावले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.स्फोटाची माहिती मिळताच अमृतसर ग्रामीण आणि शहरी पोलीस दलाचे पथक तसेच लष्कराचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण परिसर सील करण्यात आला असून, सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आलीय. फॉरेन्सिक पथके आणि श्वानपथकेही घटनास्थळी पोहोचली असून, सध्या पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सीमा भिंतीवरील पत्र्याच्या शेडला नुकसान : घटनास्थळी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या स्फोटामुळे लष्करी छावणीच्या बाहेरील सीमा भिंतीला लागून असलेल्या पत्र्याच्या शेडला नुकसान पोहोचलंय. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची अधिकृत खातरजमा झाली नसली तरी सुरक्षा यंत्रणा या संपूर्ण प्रकरणाकडे अत्यंत गांभीर्याने पाहत आहे.

पोलीस आणि सुरक्षा दले तैनात : पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केलाय. अमृतसर ग्रामीणचे एसीपी आदित्य वॉरियर यांनी सांगितले की, ''आम्हाला स्फोटाबाबत माहिती मिळाली, त्यानंतर तात्काळ पावले उचलण्यात आली. माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलीस दले आणि लष्कराचे जवान घटनास्थळी पोहोचले. बॉम्ब निकामी करणारे पथक देखील घटनास्थळी दाखल झाले असून, ते सध्या परिस्थितीचा आढावा घेत आहेत, तर फॉरेन्सिक पथके उपलब्ध असलेले सर्व पुरावे गोळा करत आहेत. या प्रकरणाचा तपास सुरू असून, तपासातून समोर येणारी कोणतीही तथ्ये जनतेसमोर मांडली जातील.'' या घटनेपूर्वी जालंधरमध्येही एक स्फोट झाला होता.

स्फोटात कोणतीही जीवितहानी झाली नाही : पोलीस अधिकारी सध्या या प्रकरणाबाबत प्रसारमाध्यमांना सविस्तर माहिती देण्याचे टाळत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, तपास पूर्ण झाल्यानंतरच या प्रकरणाची संपूर्ण सत्यस्थिती समोर येईल. या घटनेबाबत अधिक स्पष्ट तपशील आज दिवसभरात समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महत्त्वाचे म्हणजे या स्फोटापूर्वी जालंधरमधील 'बीएसएफ चौक' येथेही अशाच प्रकारच्या स्फोटाची घटना घडली होती. तिथे एका 'ॲक्टिव्हा' स्कूटरमध्ये स्फोट झाला होता; त्या स्फोटात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी त्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. या प्रकरणाच्या संदर्भात स्फोटामध्ये सहभागी असलेल्या स्कूटरच्या मालकाची पोलीस सध्या चौकशी करत आहेत. ही केवळ एक दुर्घटना होती की एखादी मोठी घटना घडवून आणण्याचा प्रयत्न याविषयी अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

# पंचायत समिती कार्यालय परिसरातील संरक्षण भिंतीवरील डिजिटल बॅनर, होल्डिंगचे तात्काळ अतिक्रमण काढण्यात यावे-ओम चादर

## ८ दिवसात अतिक्रमण न काढल्यास बेमुदत आमरण करण्याचा लेखी निवेदनाद्वारे दिला प्रशासनाला इशारा

**केज/प्रतिनिधी** : केज पंचायत समिती कार्यालय परिसरातील संरक्षण भिंतीवरील डिजिटल बॅनर, होल्डिंगचे तात्काळ अतिक्रमण काढण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे गटविकास अधिकारी यांच्याकडे ओम चादर यांच्यासह काही युवकांनी केली आहे. जर ८ दिवसात अतिक्रमण न काढल्यास बेमुदत आमरण करणार असल्याचा लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, गेल्या अनेक वर्षापासून पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरातील संरक्षण भिंती लगत होर्डिंग बोर्ड, बॅनर लावून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आलेले आहे. ग्रामीण भागातून पंचायत समिती कार्यालयात विविध कामासाठी येणाऱ्या नागरिकांना सदरच्या अतिक्रमणामुळे पंचायत समिती कार्यालय दिसून येत नाही.

सदर अतिक्रमणामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना पंचायत समिती कार्यालय शोधण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. शासनाने लाखो रुपये खर्च करून पंचायत समिती कार्यालयाची भव्य दिव्य अशी इमारत बांधलेली आहे परंतु काही लोकांनी स्वतः च्या फायद्यासाठी बॅनर लावण्यासाठी मोठ-मोठे होल्डिंग उभे केलेले आहेत सदरच्या या होल्डिंग मुळे पंचायत समिती कार्यालय हे झाकून गेलेले आहे. सध्या पंचायत समिती कार्यालय हे अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेले आहे.

सदरचे होल्डिंग वाले हे स्वतः च्या फायद्यासाठी शासनाची होल्डिंग व बॅनर लावण्यासाठी परवानगी न घेताच बेकायदेशीर रित्या सदर जागेचा वापर करत आहेत. सदर अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण करून शासनाचा महसूल देखील बुडवला आहे त्यामुळे संबंधितावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी व सदरचे अतिक्रमण काढण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे.

जर गटविकास अधिकारी यांनी सदरचे अतिक्रमण त्यांच्या स्तरावरून तात्काळ न काढल्यास व संबंधितावर



कायदेशीर कारवाई न केल्यास आठ दिवसा नंतर पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याचा प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे.

या लेखी निवेदनावर ओम चादर, महेश पिंपळे, सतीश चांदणे, रोहन मस्के इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मनपाचा नागरी निवारा बेघरांसाठी खऱ्या अर्थाने नंदनवन ठरावा : स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले

## नंदनवन उपक्रमाची पाहणी करुन बेघर नागरिकांशी बंडापल्ले यांनी साधला संवाद





**लातूर/प्रतिनिधी** : हक्काचे घर असावे असे स्वप्न पत्येक नागरीकांचे असते मात्र काही परिस्थीतीमुळे अनेक नागरिक अजूनही बेघर असून ते फुटपाथ, बस व रेल्वे स्थानक किंवा धार्मीक स्थळांचा सहारा घेऊन आपले जिवन व्यथीत करत आहेत, या बेघर नागरिकांसाठी लातूर शहर महानगर पालिकेने नंदनवन निवार योजना सुरु केलेली असुन ही योजना बेघरांसाठी खऱ्या अर्थाने नंदनवर ठरावी अशी अपेक्षा व्यक्त करुन स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी याठीकाणी राहणाऱ्या नागरिकांना आपुलकीची वागणुक देऊन त्यांची योग्य रित्या देखभाल करावी अशा सुचना दिल्या आहेत.

केंद्र शासनाच्या दीनदयाळ अंत्योदय योजना व राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाच्या माध्यमातून लातूर शहर महानगर पालिकेच्या वतीने शहरातील ठाकरे चौक येथे असलेल्या मनपाच्या शाळा क्र. ४ येथे बेघरांसाठी नंदनवन उपक्रम सुरु केलेला आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सुचने नुसार या उपक्रमास स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले व सभागृह नेते विजयकुमार साबदे यांनी बुधवार (दि.०६) रोजी भेट दिली यावेळी सभापती बंडापल्ले यांनी याठीकाणी बेघरासाठी उपलब्ध करुन दिलेल्या सुविधांची पाहणी केली. तसेच येथे वास्तव्यास असलेल्या नागरीकांसोबत संवाद साधत त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांना काही अडचणींना सामोरे जावे लागते का याबाबत विचारणा केली. वास्तव्यास असलेल्या नागरीकांनी नंदनवनचे कौतुक करत या ठिकाणी आम्हाला हक्काचा निवारा मिळवून दिल्याबद्दल सभापती बंडापल्ले यांच्यासह मनपाचे आभार मानले.

सध्या नंदनवन मध्ये ३५ बेघर नागरीक वास्तव्यास असून त्यांना वेळेवर जेवण व आरोग्य सुविधा प्राप्त व्हाव्यात अशी सुचना संबंधीतांना करुन सभापती बंडापल्ले यांनी नंदनवनचा परिसर स्वच्छ ठेवावा अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याच बरोबर याठिकाणी विद्यूतदेयकावर होणार खर्च बचत करण्यासाठी लवकरच याठिकाणी सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात येईल असे सांगुण नंदनवन परिसरास संरक्षण भिंत उभरण्यासाठीचा प्रस्ताव तात्काळ तयार करावा अशी सूचना केली. या परिसरात पेवर ब्लॉक बसवून वृक्ष लागवड करुन त्याची निगा राखावी अशी सूचना करत याठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या बेघरांना हा परिसर व उपक्रम खऱ्या अर्थाने नंदनवन ठरावा यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्पर राहून सेवा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी प्रकल्प अधिकारी लक्ष्मण जाधव यांच्या सह इतर अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# 'वंदे मातरम्'चा अपमान करणे आता गंभीर गुन्हा; केंद्र सरकारचा मोठा निर्णय, कायद्यात दुरुस्ती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : देशभक्तीशी निगडित प्रतीकांचा सन्मान अबाधित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचा अपमान करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी केंद्राने राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक कायदा, १९७१ या कायद्यात महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ५ मे रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या दुरुस्तीमुळे 'वंदे मातरम' गाताना अडथळा आणणे, त्याचा अवमान करणे किंवा कार्यक्रमात त्याचा अपमानास्पद वापर करणे हे आता दंडनीय गुन्हा ठरणार आहे. सध्याच्या कायद्यानुसार राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज आणि राज्यघटनेचा अपमान केल्यास ३ वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा आहे. आता हाच नियम 'वंदे मातरम'लाही लागू होणार असल्याने राष्ट्रीय गीतालाही समान कायदेशीर संरक्षण मिळणार आहे.

यापूर्वी गृह मंत्रालयाकडून 'वंदे मातरम' संदर्भात दिलेल्या सूचना केवळ सल्लागार स्वरूपाच्या होत्या. मात्र, नव्या दुरुस्तीमुळे या सूचनांना कायदेशीर बळ मिळणार आहे. ६ फेब्रुवारी रोजी जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, अधिकृत कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम'ची सर्व सहा कडवी (सुमारे ३ मिनिटे) गायली किंवा वाजवली जावीत, असे सांगण्यात आले आहे. तसेच, ज्या कार्यक्रमात राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत दोन्ही असतील, तिथे 'वंदे मातरम'ला प्राधान्य देण्याचीही सूचना आहे.

'वंदे मातरम' हे प्रसिद्ध साहित्यिक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिले असून ते त्यांच्या आनंदमठ या कादंबरीत प्रथम प्रकाशित झाले. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात या गीताने देशभक्तीची भावना जागवण्यात मोठी भूमिका बजावली होती. १९३७ साली काँग्रेसने त्यातील पहिल्या दोन कडव्यांना मान्यता दिली आणि पुढे भारतीय राज्यघटनेने 'राष्ट्रीय गीत' म्हणून त्याला दर्जा दिला.

केंद्राच्या या निर्णयामुळे देशातील राष्ट्रीय प्रतीकांच्या सन्मानाबाबत अधिक कडक भूमिका घेतली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे

. तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या अपमानास आळा बसावा, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे मानले जात आहे.

# पुण्यानंतर आता अकोला हादरलं; ६० वर्षीय वृद्धाचा दहा वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार

**अकोला/प्रतिनिधी :** सध्या राज्यात नसरापूरच्या आणि पर्वती येथील अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनेवरून सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. याच प्रकारची संतापजनक घटना अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यातल्या चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत घडली आहे. चान्नी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या एका गावात एका ६० वर्षीय वृद्धाने शेजारी राहणाऱ्या दहा वर्षीय चिमुकलीवर अत्याचार केला आहे. मुलीचे आई-वडील शेतात मोलमजुरी करायला गेल्यानंतर शेजारीच राहणाऱ्या वृद्धाने या चिमुकलीवर चार ते पाच दिवसांपासून वारंवार अत्याचार केला आहे. पीडित चिमुकली आधी भीतीमुळे घरी सांगत नव्हती. मात्र, काल पीडित मुलीने ही बाब आई-वडिलांना सांगितल्यानंतर यासंदर्भात चान्नी पोलिसांमध्ये तक्रार करण्यात आली आहे. यासंदर्भात आरोपी वृद्धावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर तो फरार झाला आहे. पोलिसांची तीन पथकं आरोपींच्या शोधासाठी रवाना झाले आहेत.

तर या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पिडीत अल्पवयीन मुलीचे आई-वडील हे शेतात मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात, आई वडील कामावरती गेल्यानंतर शेजारीच राहणाऱ्या वृद्धाने या चिमुकलीवर चार ते पाच दिवसांपासून वारंवार अत्याचार केला आहे. भीतीने चिमुरडी घरी सांगत नव्हती पण आई वडीलांनी तिला विश्वासात घेऊन विचारल्यानंतर तिने तिच्यासोबत घडलेली आपबिती सांगितली, या घटनेनं परिसरात संतापाची लाट पसली आहे. पुण्यातील पर्वती पायथ्याजवळील एक धक्कादायक घटना समोर आली. ७० वर्षीय आजोबाने सख्ख्या ९ वर्षांच्या नातीवर अत्याचाराचा प्रयत्न केला. शेजाऱ्यांना मुलीचा आरडाओरडा ऐकू आल्यानंतर ते घराजवळ पोहोचले आणि त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या नराधम आजोबावर पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. सदर प्रकरणी चिमुकलीवरील अनर्थ कसा टळला याबाबत माहिती समोर आली आहे. नातू आणि नात आरोपी आजोबाला भेटण्यासाठी आले होते. आरोपीने नातूला पैसे दिले आणि खाऊ खाऊन ये असं सांगितलं. नंतर आरोपीने नातीच्या अंगावरील कपडे काढले आणि स्वत:च्या अंगावरीलही कपडे काढले. आरोपी पत्र्याच्या घरात राहिला असल्याने एका महिलेचे लक्ष गेलं आणि हा सगळा प्रकार उघडकीस आला. सुट्टीसाठी आजीच्या घरी आलेली ४ वर्षांची चिमुकली अंगणात खेळत होती. त्यावेळी १ मे रोजी ६५ वर्षांच्या आरोपीने तिला गोठ्यात नेलं. तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. एवढंच नाहीतर तिला दगडाने ठेचून तिची हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेऊन पळ काढला. इतकं गंभीर कृत्य करूनही या नराधमाला त्याचा जराही पश्चाताप झालेला नाही. ग्रामस्थांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं.

# केज उपजिल्हा रुग्णालय शस्त्रक्रियात जिल्ह्यात अव्वल; रुग्णसेवेचा उच्चांक

**केज/प्रतिनिधी** : केज येथील उपजिल्हा रुग्णालयाने आरोग्य सेवेमध्ये एक मोठी झेप घेतली आहे. दर्जेदार उपचार आणि यशस्वी शस्त्रक्रियांच्या जोरावर या रुग्णालयाने संपूर्ण जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, सर्वसामान्यांसाठी हे रुग्णालय आता एक मोठा आधारवड ठरत आहे. उपजिल्हा रुग्णालयाने मागील वर्षभरात २११७ शस्त्रक्रिया करून प्रथम क्रमांकावर उच्चांक गाठला आहे.

वैद्यकीय अधीक्षक जनरल सर्जन डॉ.दत्तात्रेय केंद्रे,स्त्री रोग तज्ञ डॉ. केशव इंगोले, शस्त्रक्रिया विभाग प्रमुख डॉ.चाळक भाऊसाहेब, डॉ. स्वाती साखरे, भूलतज्ञ डॉ.दिगंबर मुंडे, श्रीमती डॉ.पाटील,बालरोग तज्ञ डॉ. सावंत बालासाहेब, डॉ.निवृत्ती मुंडे, ऑर्थो तज्ञ डॉ.अमोल गीते, डॉ.श्रीकृष्ण म्हात्रे, नेत्रचिकित्सा विभाग डॉ.सुमित




कुलकर्णी, डॉ पाटील, डॉ घुगे, डॉ. हजारे, डॉ.पवार,श्रीमती शस्त्रक्रियागृह विभाग प्रमुख श्रीमती साळवे, रक्तपेढी विभाग श्रीकृष्ण नागरगोजे श्री.महादेव इंगळे, श्रीमती सोनवणे श्रीमती गवळी, परमेश्वर राऊत, अमर वाघमारे आदींसह रुग्णालयातील सर्व डॉक्टर, कर्मचाऱ्यांच्या सेवेतून रुग्णांना आधार मिळत आहे.

स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया गाठ काढणे,हर्निया,हाडांच्या शस्त्रक्रिया अशा सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अविरतपणे केल्या जात आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना अशा विविध सुविधा मोफत उपलब्ध झाल्यामुळे त्यांना खाजगी रुग्णालयात जाण्याची गरज भासत नाही.

### - उपलब्ध सुविधा -

एक्स-रे, सोनोग्राफी, सिटीस्कॅन, यासह डायलिसिस ची सुविधा नव्याने सुरू झालेली आहे यामुळे मूत्रपिंड विकाराच्या रुग्णांना उपचाराची सोय झाली आहे. रुग्णांना सेवा देण्यासाठी आम्ही पूर्ण क्षमतेने काम करत आहोत.

### वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय केज- डॉ.दत्तात्रय केंद्रे

बीड जिल्ह्यातील एकूण ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयातुन केज उपजिल्हा रुग्णालय सर्वाधिक यशस्वी शस्त्रक्रिया करून उच्चांक गाठला याबद्दल स्त्री रोगतज्ञ डॉ. केशव इंगोले,डॉ.चाळक यांचा रुग्णालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या यशस्वी शस्त्रक्रिया बद्दल रुग्णांनी समाधान व्यक्त केले आहे.

# जलसंधारणाच्या कामांना निधी कमी पडू देणार नाही-मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

## औसा तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांची पाहणी

**लातूर/प्रतिनिधी** : पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरण्यासाठी राज्य शासनामार्फत जलयुक्त शिवार अभियान आणि गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान राबविले जात आहे. या अंतर्गत औसा तालुक्यासह लातूर जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले. त्यांनी आज औसा तालुक्यातील फत्तेपूर, दावतपूर, तांबरवाडी, राजेवाडी येथील जलसंधारणाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली.



औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार दिनकर माने, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, औसा पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती चंद्रशेखर सोनवणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी जावेद पटेल, जिल्हा ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षित पवार, टाटा मोटर्स फाऊंडशनचे जिल्हा समन्वयक प्रमाद घायाळ यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

औसा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी प्रत्येक गावात जलसंधारणाची कामे करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी पुढाकार घेतला आहे. पहिल्या टप्प्यात सात गावांची निवड करून या गावांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या संकल्पनेतून जलसमृद्ध औसा अभियान राबविण्यात येत आहे. त्यांचा हा उपक्रम कौतुकास्पद असून या उपक्रमामुळे निर्माण होणारा जलसाठा आणि भूजल पुनर्भरणामुळे भूजल पातळीत वाढ होईल. त्याचा आगामी काळात शेतकऱ्यांना फायद होईल. या गावांमध्ये नवीन बंधारा, बंधारा दुरुस्ती, नाला खोलीकरण यासारख्या कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. गावाचा विकास करण्यात गावकऱ्यांची भूमिका महत्वाची असते. गाव समृद्ध होण्यासाठी गावात जलसंधारणाची जास्तीत जास्त कामे होणे आवश्यक असून यासाठी गावकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांनी केले.

औसा तालुक्यातील भौगोलिक स्थितीमुळे याठिकाणी सिंचनासाठी पाण्याची अपुरी सुविधा आहे. त्यामुळे पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. यावर मात करण्यासाठी तालुक्यात जलसंधारणाची जास्तीत जास्त कामे करून भूजल पुनर्भरण करण्यावर भर देण्यात येत आहे. जलसमृद्ध औसा अभियान अंतर्गत गावांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध योजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येत आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून पहिल्या टप्प्यात तालक्यातील तांबरवाडी,दा वतपुर, महादेववाडी, फत्तेपुर, पारदेवाडी, कवळी (हि.) आणि हिप्परगा(क.) या सात गावांची निवड करण्यात आली आहे. राज्य शासन, टाटा मोटर्स फाउंडेशन, नाम फाउंडेशन आणि क्रिएटिव्ह फाउंडेशन मार्फत या गावांमध्ये जलसंधारणाची कामे सुरु असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी सांगितले. तसेच पुढील टप्प्यात औसा तालुक्यातील सर्वच गावांचा समावेश या गावांमध्ये केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**मृद व जलसंधारण मंत्र्यांकडून जलसंधारणाच्या कामांची पाहणी**

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी औसा तालुक्यातील फत्तेपूर येथील सुमारे ७ किलोमीटर नाल्याचे आणि तांबरवाडी, राजेवाडी येथील सुमारे ६ किलोमीटर नाल्याच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाची प्रत्यक्ष पाणी केली. तसेच दावतपूर येथे अभिसरणातून उभारण्यात आलेली अंगणवाडी इमारत, कांदाचाळ, जनावरांचा गोठा यासह विविध विकास कामांची पाहणी केली. तसेच याठिकाणी नाला खोलीकरण कामाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. येथील अमृत तलाव संवर्धन कामाचीही त्यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी, ग्रामस्थांशीही संवाद साधला.

## आसामचे मुख्यमंत्री हिमंता यांनी राज्यपालांकडे सुपूर्द केला राजीनामा; लवकरच नवीन सरकार स्थापन करणार

गुवाहाटी : आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसह बुधवारी राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द केलाय. यामुळे भाजपाच्या नेतृत्वाखालील नवीन सरकार स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झालाय. विशेष म्हणजे २०२६ च्या आसाम विधानसभा निवडणुकीत 'एनडीए'ने (~ऊअ) दणदणीत विजय मिळवला, ज्याचे निकाल ४ मे रोजी जाहीर करण्यात आले होते. भाजपाच्या नेतृत्वाखालील 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'ने (~ऊअ) १२६ सदस्यांच्या विधानसभेत १०२ जागांवर विजय मिळवला. आसाममधील विधानसभा निवडणुका ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात पार पडल्या होत्या आणि ४ मे रोजी मतमोजणी झाली होती.

नवीन सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया सुलभ : या संदर्भात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री कार्यालयाने'' (पूर्वीचे ट्विटर) वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''२०२६ च्या आसाम निवडणुकीचे निकाल अधिकृतपणे जाहीर झाल्यानंतर आणि नवीन सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी डॉ. हिमंता बिस्वा सरमा यांनी आज 'लोक भवन' येथे माननीय राज्यपाल लक्ष्मण आचार्य यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा सुपूर्द केला; त्याच वेळी त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनीही आपले राजीनामे सादर केले.''

काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहणार : त्या पोस्टमध्ये पुढे असेही नमूद करण्यात आलंय की, राज्यपालांनी हा राजीनामा स्वीकारला असून, नवीन सरकार सत्तेवर येईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पुढे चालू ठेवण्याची विनंती त्यांनी सरमा यांना केलीय. दरम्यान, 'लोक भवन'च्या बाहेर प्रसारमाध्यमांशी बोलताना सरमा यांनी संकेत दिलेत की, नवीन सरकारचा शपथविधी समारंभ ११ मे नंतर होण्याची शक्यता आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचा राज्यस्तरीय पुरस्कार

# विद्रोही कवी राजेश भांडे यांना प्रदान



**लातूर/प्रतिनिधी** : लातुर येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात दि.२८मंगळवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी,लातूर यांनी आयोजित केलेल्या २रे राज्यस्तरीय साहित्य संमेलनात २०२५ चा पुस्तक पुरस्कार विद्रोही कवी राजेश भांडे यांच्या वेशीबाहेर या काव्यसंग्रहाला राजश्री शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. महादेवराव गव्हाणे सरांच्या हस्ते व प्राचार्य माधव गादेकर, ऍड श्रीधर गायकवाड जेष्ठकवी प्रकाश धागदीने , श्रीमती कुसुमताई संभाजी घोडके, संजय जमदाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत लातुर येथे देण्यात आला.

या साहित्य सम्मेलनाचे उदघाटक जेष्ठ साहित्यिक प्रा.फ.म.शहाजिंदे यांच्या हस्ते होवुन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य माधवराव गादेकर सर उपस्थित होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य महादेवराव गव्हाणे म्हणाले की, साहित्य हे समाज जीवनाचा आरसा असते.आपल्या अवतीभवती असलेल्या समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटले पाहिजे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य गादेकर सर आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, तळागाळातील शेवटच्या माणसाच्या पलीकडेही अनेक समाजाचे चेहरे लपलेले असतात.ते न्यायापासून आजही कोसो दूर्लक्षित आहेत.आशा समाजाचे प्रश्न, दुःख, वेदना, आक्रोश साहित्यात कवीने, लेखकांनी प्रभावीपणे मांडला पाहिजे.जे साहित्य सत्यकथन करते ते साहित्य चिरकाल टिकते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीने आयोजित या एकदिवसीय साहित्य संम्मेलनात कथाकथन, परिसंवाद,कविसंमेलन असा भरघोस साहित्य मेजवानी उपस्थितांना ऐकण्यास मिळाली. या साहित्य संमेलनात प्रा.डॉ. सदाशिव शिंदे, प्रा.डॉ.दुशांत कठारे, प्रा.डॉ. लहू वाघमारे, प्रा.डॉ.जयद्रथ जाधव, कथाकार जी.जी. कांबळे, वृषाली पाटील, आदीनी भाग घेतला.या साहित्य संमेलनात महाराष्ट्र राज्यातून अनेक नामवंत साहित्यिक कवी,लेखक उपस्थित होते. या कार्यक्रमातील विविधसत्राचे सूत्रसंचालन दयानंद कांबळे, अर्जुन कांबळे, उत्तम दोरवे, अंगद गायकवाड, प्रा.रामकिशन समुखराव केले तर आभार प्रदर्शन संजय जमदाडे यांनी मानले.

# लातूर जिल्हा रुग्णालयाचा मास्टर प्लान तयार करावा

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांची आग्रही मागणी

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्हा रुग्णालयाच्या उभारणीला गती दिल्याबद्दल माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंत्रालयात राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री मा. श्री. प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयाचे काम अधिक दर्जेदार आणि भविष्यवेधी व्हावे, यासाठी काही महत्त्वाच्या मागण्या व सूचनांचे निवेदन सादर केले.

खाटांची संख्या वाढवण्याची मागणी

लातूर जिल्ह्याची सध्याची वाढलेली लोकसंख्या विचारात घेता, प्रस्तावित रुग्णालयातील खाटांची संख्या वाढवण्यात यावी, अशी आग्रही मागणी आमदार अमित देशमुख यांनी आरोग्यमंत्र्यांकडे केली. वाढत्या रुग्णसंख्येला पुरेशी आरोग्य सेवा मिळावी, हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तज्ज्ञ सल्लागार आणि मास्टर प्लानवर भर

नवीन जिल्हा रुग्णालय उभारणीच्या प्रक्रियेत राज्य आणि केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाने अलीकडच्या काळात काही सुधारणा आणि मार्गदर्शक सूचना सुचवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी रुग्णालयाचे निकष, अटी आणि शर्तींची काटेकोर पूर्तता होण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी रुग्णालय सल्लागार (वास्तुविशारद) यांची नियुक्ती करावी. नियुक्त सल्लागाराकडून संपूर्ण रुग्णालय संकुलाचा एक सर्वंकष मास्टर प्लान तयार करून घ्यावा. या मास्टर प्लानमध्ये संबंधित सर्व विभागांच्या सूचनांचा अंतर्भाव व्हावा, यासाठी एका विशेष बैठकीचे आयोजन करावे अशी मागणी त्यांनी केली.



आरोग्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी मांडलेल्या या सर्व तांत्रिक आणि धोरणात्मक मागण्यांची सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गांभीर्याने दखल घेतली. त्यांनी या सर्व मुद्द्यांवर अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला असून, प्रशासकीय पातळीवर या मागण्यांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले. या महत्त्वपूर्ण चर्चेमुळे लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रकल्प आता अधिक आधुनिक आणि सक्षम स्वरूपात साकारला जाणार आहे.

## उजनी धरण मायनसमध्ये; पुणे-सोलापूर-अहिल्यानगरसाठी पाण्याची चिंता वाढली

**बारामती/प्रतिनिधी** : पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांसाठी जीवनदायिनी मानलं जाणारं उजनी धरण सध्या मायनस पातळीवर गेलं आहे. त्यामुळे या तीनही जिल्ह्यांतील पाणी परिस्थिती गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या उजनी धरणामध्ये एकूण साठवण क्षमतेपैकी केवळ ६३.३१ टीएमसी इतकाच पाणीसाठा उपलब्ध आहे.उजनी धरण पूर्ण क्षमतेनं भरल्यास त्यामध्ये सुमारे ११७ टीएमसी पाणी साठवता येतं. यापैकी ५४ टीएमसी पाणी 'जिवंत साठा' म्हणून वापरण्यायोग्य असतो, तर उर्वरित ६३ टीएमसी 'मृत साठा' म्हणून गणला जातो. सध्या धरणातील पाणी मृत साठ्याच्या पातळीवर पोहोचल्यानं प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध पाणी अत्यल्प उरलं आहे.उजनी धरणावर पुणे, सोलापूर जिल्ह्यातील शेती मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. याशिवाय ग्रामी तसंच शहरी भागातील शेकडो पाणीपुरवठा योजना देखील या धरणावर आधारित आहेत. त्यामुळे धरण मायनसमध्ये गेल्यानं शेतीला पाणीटंचाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तसंच पिण्याच्या पाण्याच्या योजनांवरही ताण वाढणार असून प्रशासनासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. सध्या उपलब्ध असलेल्या मर्यादित पाणीसाठ्यावरच पुढील दोन ते अडीच महिने काढावे लागणार असल्यानं काटकसरीनं पाणी वापरण्याची गरज निर्माण झाली आहे. दरम्यान, प्रशासनानं पाणी वापराबाबत नियोजन करण्यास सुरुवात केली असून नागरिकांनीही पाणी जपून वापरण्याचं आवाहन करण्यात येत आहे. आगामी काळात पावसाळा लांबल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

राज्यात सर्वत्रच उन्हाळा वाढला आहे. त्यामुळे जलस्रोतांचं बाष्पीभवन वेगानं होत आहे. पाऊस नसल्यानं त्याचं पुनर्भरणही होत नाही. त्यामुळे एखादा पाऊस पडेपर्यंत ही समस्या आणखी गंभीर होत जाणार आहे.

## काळाराम मंदिरात धर्मध्वज स्थापना; रामनाथ कोविंद, मुख्यमंत्री फडणवीसांच्या उपस्थितीत धर्मध्वज उभारणार

**नाशिक/प्रतिनिधी** : माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नाशिक दौऱ्यावर आहेत. यादरम्यान, पंचवटीतील श्री काळाराम संस्थानच्या वतीने आज ४.४४ वाजता धर्मध्वज स्थापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोबतच अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष गोविंददेव गिरी महाराज, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, (डिक्की) अध्यक्ष मिलिंद कांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. धर्मध्वज स्थापना कार्यक्रमास सकाळपासून सुरुवात झाली असून दुपारी चारपर्यंत विधीवत पूजन होईल. यासाठी प्रधान आचार्य म्हणून महंत सुधीरदास महाराज, पौरोहित्य शांताराम भानोसे, पं. दिनेश गायधनी करणार आहेत. पुरातन ध्वज १९६२ साली मंदिरात स्थापित झाला होता. वातावरणातील बदलाने सद्यस्थितीत तो जीर्ण अवस्थेत असल्याने धर्मध्वजारोहण होत आहे. जवळपास काळाराम मंदिरात ६४ वर्षांनंतर नवा धर्मध्वज उभारण्यात येणार आहे. श्री काळाराम मंदिर देवस्थानाचा प्राचीन धर्मध्वज जीर्ण झाल्याने भव्य स्वरूपात धर्मध्वज उभारण्यात येणार आहे. १९६२ साली धर्मध्वज उभारण्यात आला होता. वातावरणातील बदलामुळे तो जीर्ण झाला आहे. धर्मस्तंभ (ध्वजस्तंभ) अयोध्या येथील नमुन्यावर तसेच धर्मशास्त्रावर आधारित असून सुमारे २१ फूट उंचीचा पितळी (ब्रास) स्तंभ असेल. धर्मध्वज हा भगवा (केशरी) रंगाचा असून त्याचे परिमाण अंदाजे पाच फूट बाय ११ फूट असेल; या ध्वजावर भगवान हनुमानाची प्रतिमा तसेच जय श्रीराम, ॐ आणि चिन्ह अंकित केलेले आहे. धर्मध्वज स्थापना ही भारतीय सनातन संस्कृतीतील परंपरा असून धर्म, सत्य, शौर्य व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारी आहे; यानिमित्ताने वेदघोष, पूजन-विधी व धार्मिक अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष अक्षय कलंत्री यांनी दिली.दरम्यान, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नियोजित दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर महापौर हिमगौरी आडके, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक , जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी मंदिराला भेट देत पाहणी करुन सुरक्षेचा आढावा घेतला.

नाशिकच्या पंचवटीतील काळाराम मंदिर हे १७८२ मध्ये सरदार रंगराव ओढेकर यांनी काळ्या पाषाणात उभारलेले भगवान श्रीरामाचे ऐतिहासिक आणि जागृत मंदिर आहे. गोदावरी नदीच्या काठावर, प्रभू राम वनवासात राहिले होते, त्या ठिकाणी हे मंदिर आहे. येथे राम, सीता आणि लक्ष्मणाच्या काळ्या मूर्ती आहेत, तसेच हे मंदिर सामाजिक सुधारणांचा साक्षीदार आहे. हे मंदिर नाशिकच्या पंचवटी भागात स्थित आहे. जुन्या लाकडी मंदिराच्या जागी १७८२ मध्ये पेशव्यांचे सरदार रंगराव ओढेकर यांनी हे मंदिर बांधले, ज्यासाठी सुमारे १२ वर्षे लागली. मंदिराचे बांधकाम काळ्या पाषाणात केलेले आहे. हे १८ व्या शतकातील उत्कृष्ट वास्तुकलेचे उदाहरण मानले जाते.

# आता तिरुपतीचा प्रवास सोपा झालाय!

## लातूरकरांनो, आता दर शनिवार-रविवारी थेट तिरुपतीला जा

**लातूर/प्रतिनिधी** : दक्षिण मध्य रेल्वेने अधिकृत परिपत्रक जारी केलं. तिरुपती-पंढरपूर ही विशेष गाडी आता १७४३७/३८ या क्रमांकाने एक्सप्रेस गाडी आता कायमस्वरूपी धावणार. १६ मे २०२६ शनिवारपासून तिरुपती-पंढरपूर एक्सप्रेस आणि १७ मे २०२६ रविवारपासून पंढरपूर-तिरुपती एक्सप्रेस नियमितपणे सुरू होणार आहे. मार्ग आणि वेळापत्रक असं आहे: १७४३७ तिरुपती-पंढरपूर एक्सप्रेस - शनिवार तिरुपती १६:०० वाजता सुटणार. रेनिगुंठा, राजमपेट, कडप्पा, येर्रागुंटला, ताडपत्री, गुटी, धोने, कुर्नूल सिटी, गडवल, महबूबनगर, शादनगर, काचेगुडा, सिकंदराबाद ०६:४० ते ०६:५०, बेगमपेट, लिंगमपल्ली, विकाराबाद, झहीराबाद, बिदर ०९:५२ ते ०९:५५, उदगीर ११:०३ ते ११:०५, लातूर रोड १३:४० ते १३:४५, लातूर १४:१० ते १४:१५, धाराशिव, बार्शी टाऊन, कुर्डुवाडी जं, मोडलिंब मार्गे पंढरपूरला रविवारी १९:०० वाजता पोहोचेल.१७४३८ पंढरपूर-तिरुपती एक्सप्रेस - रविवार पंढरपूर २०:०० वाजता सुटणार. कुर्डुवाडी, बार्शी, धाराशिव, लातूर २३:४० ते २३:४५, लातूर रोड ००:४० ते ००:४५, उदगीर, बिदर, झहीराबाद, विकाराबाद, लिंगमपल्ली, सिकंदराबाद ०८:४० ते ०८:५०, महबूबनगर, कर नूल, धोने, गुटी, ताडपत्री मार्गे तिरुपतीला सोमवारी २३:३० वाजता पोहोचेल.डब्यांची रचना: एक एसी २ टियर, तीन एसी ३ टियर, चौदा स्लीपर, चार जनरल, दोन द्वितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर असे एकूण २४ डबे. तिकिट दर मात्र




सामान्य एक्सप्रेसप्रमाणेच राहणार.ही मागणी लातूरचे विभागीय सल्लागार समिती सदस्य संजय निलेगावकर यांनी १० ऑक्टोबर २०२५ रोजी सोलापूर येथील मध्य रेल्वे सल्लागार समिती बैठकीत लावून धरली होती. त्यांच्या प्रयत्नाला आता यश आलं.लातूर आणि परिसरातील भाविकांसाठी तिरुपती बालाजी आणि पंढरपूर विठ्ठल दर्शन आता हाकेच्या अंतरावर. संजय निलेगावकर यांनी नागरिकांना या गाडीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचं आवाहन केलंय.तर लातूरकरांनो, बॅग भरा... बालाजीच्या दर्शनाला निघा!

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉर्पींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.